महाराष्ट्र शासन
महसुल व वनविभाग
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम प्रदेश, मुंबई यांचेकार्यालय
जुनी एमएचबी कॉलनी, एलटी रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९१
दुरध्वनी क्र.०२२/२८६९२६६८, २८६९२५९३ ईमेल - apccfwlmumbai@mahaforest.gov.in

जा.क्र.कक्ष-३/जमीन/NBWL/प्र.क्र.१६३/2691/२०२०-२१ दिनांक- 16 डिसेंबर २०२०.

पत्र/ईमेलव्दारे

विषय :- यावल अभयारण्याच्या ईको सेन्सीटीव्ह झोनमध्ये प्रस्तावीत हांड्याकुंड्या साठवण तलाव मौजे देव्हारी ता.चोपडा जि.जळगांव या प्रकल्पात बाधील होणाऱ्या ३१.४९ हे. वनजमिन प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भ :- आपलेकडील पत्र क्र.कक्ष-४/सर्व्हे/वजी/प्र.क्र.९/८१४, दि.०९/१२/२०२०.

विषयांकीत प्रकरणी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचे मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव आपण संदर्भिय पत्रान्वये या कर्यालयास सादर केला आहे. सदर प्रस्तावाची तपासणी केल असता त्यात पूढील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१) प्रस्तावित प्रकल्पाचे क्षेत्र हे यावल वन्यजीव अभयारण्याच्या अधिसूचित पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये आहे.

२) सदर प्रकल्पास 'पर्यावरणीय मान्यतेची' (Environmental Clearance) ची आवश्यकता नाही. ह्या अनुषंगाने केंद्र सरकारच्या वन व पर्यावरण मंत्रालयाच्या दि.१९/१२/२०१२ (F.No.६-१०/२०११ WL) पत्राव्दारे प्राप्त झालेल्या सुधारीत मार्गदर्शक सुचनामधील अ.क्र.३.५.१ नुसार पुढील प्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे. ' In pursuance to the order of Hon'ble Supreme Court dated 4th December **2006** in Writ Petition (Civil) No. **460/2004**, in case any project requiring Environmental clearance, is located within the eco-sensitive zone around a Wildlife Sanctuary or National Park or in absence of delineation of such a zone, within a distance of **10** kms from its boundaries, the User agency Project Proponent is required to obtain recommondations of the Standing Committee of NBWL.'

कृ.मा.प.

३) विषयांकीत प्रकरणाबाबतच्या प्रस्ताव हा ३१.४९ हे वनजमीनवर साठवण तलाव तयार करण्याच्या प्रस्ताव असून त्यामध्ये कुठल्याही "Hydro-Electri Project" चा अंतर्गत नाही. तसेच सदर साठवण तलावाला कोणतेही कालवे (Canals) काढण्यात येणार नसल्याने या १०००० हे किंवा त्यापेक्षा जास्त Culturable command area लागणार नाही, असे प्रस्तावाचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

४) तसेच प्रस्तावातील Information Sheet-A Sr.No.१३ मध्ये 'Environmental Clearance Not required' असे स्पष्टपणे नमुद केले आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास (प्रकल्पास) Environmental Clearance ची आवश्यकता नसल्यानमुळे सदरचा प्रस्ताव NBWL च्या Standing Committee च्या मान्यतेस्तव पाठविण्याची आवश्यकता नाही.

५) परंतु प्रस्तावित प्रकल्पासाठी लागणारे क्षेत्र हे उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यावल विभागाकडील ३१.४९ हे. राखीव वन आहे. परंतु प्रकल्पयंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव अद्याप संबंधिताकडे सादर केलेला नाही असे दिसून येते.

६) सदरचे प्रस्ताव यावल अभयारण्याचे 'पर्यावरण संवेदनशील' क्षेत्राचे 'संनियंत्रण समिती' (Monitoring Committee) ची मान्यता घेतले बाबतचे पत्र प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेले नाही. मात्र प्रकल्प यंत्रणेच्या प्रतिनिधीने या प्रस्तावास यावल अभयारणाच्या पर्यावरण संवेदनशिल क्षेत्राच्या सनियंत्रण समितीने दिलेल्या 'ना हरकत प्रमाणपत्राची' प्रत या कार्यालयास पाठवीली आहे. सदर पत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते आहे की, यावल अभयारण्यातील वन्यजीव व वन्यजीव अधिवासाचे विकास करणेकरीता सदर प्रकल्पाच्या एकूण प्रकल्प किंमतीच्या २% रक्कम वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांचेकडे जमा करणेबाबतच्या अटीचा समावेश संनियत्रण समितीने सदर प्रकल्पास ' ना हरकत ' प्रमाणपत्र देताना केलेला नाही.

सदर प्रस्तावामध्ये प्रकल्प यंत्रणेने प्रकल्प किमतीच्या २% रक्कम नाशिक वन्यजीव विभागाकडे जमा करणेबाबतचे प्रमाणपत्र प्रस्तावात जोडले आहे. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडील दि.१८/०८/२०१५ रोजीच्या ३५ व्या बैठकीतील स्थायी समितीचे निर्देशानुसार (पान क्र. ३१ - मुद्दा क्र.III) प्रकल्प किंमतीच्या २% रक्कम अथवा वन्यजीव संवर्धन व उपशमन योजना १० वर्षाकरीता कार्यान्वीत करणेकरीता लागणारी रक्कम या पैकी जे जास्त असेल ते प्रकल्प यंत्रणेकडुन वसुल करण्यात यावे. त्यामुळे यावल अभयारण्याच्या Eco Sensitive Zone जिल्हा स्तरीय सनियंत्रण

कृ.मा.प.

समितीकडुन या प्रकरणी आदेश प्राप्त करुन घेऊन त्यानुसार प्रकल्प यंत्रणेकडुन रक्कम वसूल करण्यात यावी.

यावल अभयारण्याचे Eco Sensitive Zone घोषित करण्याच्या अधिसूचनेमध्ये मुद्दा क्र.२ व ३ मध्ये नमुद केल्यानुसार सदर क्षेत्राचा 'Zonal Master Plan' तयार करावयाचा असल्याने व सदर अधिसूचनेतील बाब क्र.६(१) मध्ये नमुद केल्यानुसार अधिसूचनेच्या अनुपालनाच्या सनियंत्रणाची जबाबदारी सदर ' Monitoring Committee ' कडे असल्याने त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. उपरोक्त अनु.क्र.२, ३, व ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे तसेच सदर प्रस्तावास यावल अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशिल क्षेत्राच्या सनियंत्रण समितीने "ना हरकत" प्रमाणपत्र दिल्याने त्यास NBWL ची आवश्यकता नसल्याने प्रस्तावाच्या ४ प्रती परत पाठविण्यात येत आहेत.

सहपत्र :- वरीलप्रमाणे. (प्रस्तावाच्या ४ प्रती)

16/12/20

( सुनील लिमये )
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन्यजीव) पश्चिम, मुंबई

प्रति,

श्री.अनिल अंजनकर, भा.व.से.,
वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक.

प्रतिलिपी :- प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अध्यक्ष, इको सेन्सिटीव्ह झोन, जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती तथा जिल्हाधिकारी जळगांव यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- उप वनसंरक्षक (प्रादेशिक), यावल माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.